महावितरण

# जाहिर सुचना

**शिकाऊ उमेदवार अधिनियम–१९६१ अन्वये एक वर्ष (२०२३ ते २०२४) करिता आय.टी.आय. शिकाऊ उमेदवार म्हणुन भरती प्रक्रीया संबधी**

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन वीजतंत्री / तारतंत्री व कोपा या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते की, महावितरण, हिंगणघाट विभागाअंतर्गत सन २०२३-२०२४ करिता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी करारबध्द करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी या http://www.apprenticeshipindia.gov.in संकेतस्थळावर शिकाऊ उमेदवारी करिता दिनांक ०३-१०-२०२३ ते दिनांक ०९-१०-२०२३ आस्थापना नोंदणी क्रमांकावर (E05202702795) Online अर्ज करावे.

१)विजतंत्री (Electrician) १३ पदे, २)तारतंत्री (Wireman) १३ पदे,३)कोपा (COPA) ८ पदे

१)शैक्षणिक अर्हता:– महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र किंवा तत्सम परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक व NCVT नवी दिल्ली मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री / तारतंत्री / कोपा या व्यवसायात उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. २) वयोमर्यादा १८ ते ३८ वर्ष (मागासवर्गीयासाठी ०५ वर्ष शिथीलक्षम). ३)कालावधी ०१ वर्ष राहील. ४)विद्यावेतन नियमाप्रमाणे लागु राहिल. ५)भरती प्रक्रीया निगडीत असलेले सर्व अधिकार व्यवस्थापनाने राखुन ठेवलेले आहे. व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारांस कळविल्या जाणार नाही. ६)एस.एस.सी. उत्तीर्ण गुणपत्रिका व सनद प्रमाण पत्राची साक्षांकीत प्रत. ७)आय.टी.आय. उत्तीर्ण गुणपत्रिका (चार सेमिस्टर) व सर्व शैक्षणिक प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत. ८)उमेदवाराने मागास प्रवर्ग अर्ज केला असल्यास जात प्रमाणपत्राची प्रत जोडावी. ९)भरती प्रक्रीये दरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिकाऱ्यांकडुन दबाव आणल्यास आपली उमेदवारी रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी. १०)शिकाऊ उमेदवार हे फक्त महावितरण विभाग हिंगणघाट यांच्या कार्यक्षेत्राअंतर्गत रहिवासी असलेलेच उमेदवारांचे अर्ज ग्राहय धरण्यात येईल, तसेच वर्धा जिल्हातील अधिवास (Domicile) प्रमाणपत्र असने आवश्यक आहे. ११)या जाहीरातीच्या पुर्वीचे अर्ज व दिनांक ०९.१०.२०२३ नंतरचे कोणतेही अर्ज ग्राहय धरल्या जाणार नाही. उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज करतांना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्रे स्कॅन करून योग्य रितीने अपलोड करणे बंधनकारक आहे. वरिल कालावधीत ऑनलाईन पध्दतीने अर्ज न केल्यास अशा अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. शिकाऊ उमेदवारांची निवड हि आय.टी.आय. गुणांच्या टक्केवारी प्रमाणे व वरिल अटी व शर्तीच्या अधीन राहुन प्रवर्गनिहाय निवड केली जाणार आहे. १२)ऑनलाईन अर्ज भरलेल्या पात्र उमेदवारांनी खाली नमुद केलेल्या ठिकाणी शैक्षणिक संपुर्ण मुळ प्रमाणपत्रे व प्रोफाईल सह तपासणी करिता व त्यासोबत छायांकीत प्रतीचा एक संच घेऊन खालील तारखेनुसार उपस्थित राहावे. वेळेवर सदर प्रक्रीयेत बदल करण्याचा अधिकार संबधीत कार्यालयाचे सक्षम अधिकाऱ्यास राहतील. कार्यालयाचे नाव:– कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. सं.व.सु विभाग नांदगाव रोड हिंगणघाट. वीजतंत्री:– दिनांक १२.१०.२०२३ रोजी सकाळी ११:00 वाजता तारतंत्री :– दिनांक १२.१०.२०२३ रोजी सकाळी ११:00 वाजता कोपा :– दिनांक १३.१०.२०२३ रोजी सकाळी ११:00 वाजता

कार्यकारी अभियंता

सं.व.सु. विभाग, महावितरण, हिंगणघाट

PRO NO. 125